Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/मुल्यांकन/२०२५/454 दिनांक : १२.०६.२०२५

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक,**
**सर्व संबंधित अभ्यासक्रमांचे महाविद्यालय/परिसंस्था,**
**(बीड व धाराशिव जिल्हा)**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर.**

**विषय : मार्च/एप्रिल, २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एम.कॉम. अभ्यासक्रमांच्या उत्तरपत्रिका मूल्यमापनाकरिता सर्व नियमित, कंत्राटी व तासिका तत्वावरील अध्यापकांना क्षेत्रीय मूल्यमापन केंद्रावर रुजु होण्यासाठी पुर्ण वेळ कार्यमुक्त करणेबाबत.**

**संदर्भ :** १. दि. ०३.०६.२०२५ रोजीची कस्टोडियन, जिल्हा मुल्यांकन केंद्र यांच्या सोबत झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने
२. कस्टोडियन, क्षेत्रीय पदव्युत्तर मूल्यमापन केंद्र, विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव यांचे पत्र संदर्भ क्र. Dr.BAMU/SCD/PG-CAS/2024-25/19 दि. १२.०६.२०२५

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उन्हाळी-२०२५ च्या मार्च/एप्रिल, २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या एम.कॉम. अभ्यासक्रमांच्या परीक्षा संपलेल्या असून छत्रपती संभाजीनगर व धाराशिव जिल्ह्यांकरिता क्षेत्रीय मूल्यमापन केंद्र निश्चित करण्यात आलेले आहे. सदर मूल्यमापन केंद्रावर उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे कार्य सुरु असुन विविध विषयांच्या उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी अध्यापकांचा सहभाग अत्यंत अल्प आहे. असे कळविले आहे.

**मा. कुलगुरु महोदय यांच्या आदेशान्वये आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ संलग्नित एम.कॉम. अभ्यासक्रमांच्या महाविद्यालय/परिसंस्थेतील नियमित, कंत्राटी व तासिका तत्वावरील अध्यापकांना खालील तक्त्यात नमुद केलेल्या क्षेत्रीय मूल्यमापन केंद्रावर एम.कॉम. अभ्यासक्रमांच्या संबंधित विषयांच्या उत्तरपत्रिका मुल्यांकनाकरिता दि. १३.०६.२०२५ ते २३.०६.२०२५ रोजीपर्यंत किंवा उत्तरपत्रिका मूल्यमापनचे कार्य जो कालावधी आधी संपेल तोपर्यत उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी पुर्णवेळ रुजू होऊन मूल्यमापनाच्या कार्यास गती देण्यासंदर्भात प्राचार्यांनी आदेश निर्गमित करुन त्या पत्राची प्रत याकार्यालयाच्या dcasunit.exam@bamu.ac.in या ई-मेल आयडीवर पाठवावी.**

**कृ.मा.पहा**

| Sr. No. | Name of D-CAS Center | Course & Subject | District Name |
|---|---|---|---|
| 8. | PG, D-CAS Center, Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Sub-Campus, Dharashiv | **M.Com.** 1. Advanced Cost Accounting 2. Security Management 3. Financial Management 4. Corporate Financial Accounting **Subjects** | Teachers of All Affiliated Colleges Beed & Dharashiv District |

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४८(४) तरतुदीनुसार प्रत्येक अध्यापक आणि अध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांवर परीक्षेच्या कामात सहभागी असणे बंधनकारक असुन जे अध्यापक उत्तरपत्रिका मूल्यमापनासाठी क्षेत्रीय मूल्यमापन केंद्रावर रुजु होणार नाहीत. अशा अध्यापकांवर सदर तरतुदीनुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

करिता, एम.कॉम. अभ्यासक्रमाच्या सर्व संबंधित विषयांच्या अध्यापकांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त नमूद क्षेत्रिय मूल्यमापन केंद्राच्या नावासमोरील विषयांच्या अध्यापकांनी पुर्णवेळ मुल्यांकन केंद्रावर उपस्थित राहून उत्तरपत्रिका मूल्यमापनाचे कार्य पूर्ण करावे, ही विनंती.

**संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**यापत्राची प्रत :**

१. कस्टोडियन, संबंधित क्षेत्रीय मूल्यामपन केंद्र यांना देण्यात येऊन कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर महाविद्यालयातील किती अध्यापक उत्तरपत्रिका मुल्यांकनाकरिता उपस्थित किंवा अनुपस्थित आहेत याबाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.
२. कक्ष अधिकारी, मा. कुलगुरु महोदय यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ यांना माहितीस्तव